महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ℡२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ℡२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. १४७७(२)/२०१९/चौदा-अ दिनांक:- १०ऑगस्ट, २०२१

**राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०१९**
**सुधारीत निकाल**
**पूर्व परीक्षा जाहिरात क्रमांक ५०/२०१८ व मुख्य परीक्षा जाहिरात क्रमांक ०७/२०१९**

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १३, १४ व १५ जुलै, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९ चा अंतिम निकाल दिनांक १९ जून, २०२० रोजी जाहीर करण्यात येऊन पात्र उमेदवारांच्या शिफारशी शासनाकडे करण्यात आल्या. दरम्यान सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ मे, २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आले आहे. सदर न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२०/प्र.क्र.३२०/१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२१ आणि बीसीसी-२०२१/प्र.क्र. ३६०/१६-ब, दिनांक १५ जुलै, २०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात व उमेदवारांच्या नियुक्तीसंदर्भात शासनाकडून कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदींनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरित करुन विषयांकित परीक्षेचा सुधारित निकाल जाहीर करण्यात येत आहे. सुधारित निकालानुसार सदर मुख्य परीक्षेत नव्याने अर्हताप्राप्त ठरलेल्या तसेच सुधारित अर्हतामानानुसार निकाल प्रक्रियेतून वगळण्यात आलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमाकांच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. उपरोक्त निकालानुसार नव्याने मुलाखतीस पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांनी अर्जामध्ये केलेल्या विविध दाव्यांच्या आधारे पात्रता तपासण्याच्या अटींच्या अधीन राहून मुलाखतीस पात्र ठरविण्यात येत आहे. या तपासणीनंतर अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

३. मुख्य परीक्षेच्या सुधारित निकालान्वये मुलाखतीसाठी नव्याने पात्र ठरलेल्या तसेच यापूर्वी मुलाखतीस उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेकरिता अधिसूचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील विहित नमुन्यात सादर करणे अनिवार्य आहे.

४. अंतिम निवडीकरिता विचार होण्यासाठी उमेदवाराने विहित पध्दतीने पसंतीक्रम सादर करणे अनिवार्य आहे. विहित पध्दतीने व विहित कालावधीमध्ये पदांचा पसंतीक्रम सादर न केल्यास संबंधित उमेदवारांचा अंतिम शिफारशीसाठी विचार करणे शक्य होणार नाही.

५. प्रस्तुत परीक्षेचा सुधारित निकाल विविध न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

६. लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे नव्याने मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. आयोगाच्या मुलाखत कार्यक्रमानुसार पात्र उमेदवारांनी मुलाखतीकरीता विहित दिनांकास व वेळेवर स्वखर्चाने उपस्थित रहावे.

७. सुधारित निकालानुसार अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना गुणांची फेर पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी सुधारित निकालानुसार लिंक ओपन झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

८. पदांचा पसंतीक्रम सादर करण्याबाबत लिंक ऑनलाईन पध्दतीने स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल व त्यानुसार विहित कालावधीमध्ये सर्व उमेदवारांनी पसंतीक्रम सादर करणे आवश्यक राहील.

उप सचिव (परीक्षा-१)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.